# हरवलेला कंठहार

## इशा सरदेसाई यांच्याद्वारे पुनर्लिखित

भारतामध्ये अनेक शतकांपूर्वी एक गर्भश्रीमंत महिला राहत होती. एका नगरातील भरचौकात तिच्या मालकीचे एक दुमजली घर होते आणि जेव्हा हवामान चांगले असे, तसे तर बरेचदा ते चांगलेच असे, तेव्हा आपल्या घराच्या बाल्कनीची दारे उघडी ठेवणे तिला अतिशय आवडत असे. यासाठी की, नगरात जर एखादी खळबळजनक गोष्ट घडली, तर ती तिला सहज ऐकू यावी.

एके दिवशी ती महिला स्नान करत होती—उबदार वाफेत मिसळून दरवळलेल्या चमेलीच्या तेलाच्या मंद सुगंधाचा आनंद ती निवांतपणे घेत होती—तेव्हा अचानक बाहेरून तरंगत येणारे काही आवाज तिच्या कानी पडू लागले. आधी उल्हासमय असे ढोल-ताशांचे पडघम ऐकू आले, त्या मागोमाग बासरीची स्वरकंपने आणि त्यानंतर जणू अनेक तुताऱ्या एकाच वेळी वाजल्या असता होणारा सुखद पण कर्णकटू आवाज ऐकू आला. ते संगीत अत्यंत हर्षभरित करणारे होते आणि ते आणखी नीट ऐकावे व बाहेर काय घडते आहे, ते प्रत्यक्ष पाहता यावे अशी इच्छा त्या महिलेला झाली.

ती पटकन तिच्या आंघोळीच्या घंघाळातून बाहेर आली, पाणी इकडेतिकडे सांडले तरीही तिला त्याची पर्वाच नव्हती. तिने चटकन टॉवेल खेचला आणि तयार व्हायला गेली. संगीताचा आवाज वाढतच चालला होता, असे वाटत होते की जणू एखादी मिरवणूक निघाली आहे आणि तिला वाटत होते की, ती मिरवणूक पाहण्याची संधी तिच्या हातून निसटता कामा नये. आपल्या कपाटाच्या शोभिवंत लाकडी दारांना हिसका देऊन उघडत तिने दिसेल ती पहिली साडी त्यातून काढली आणि घाईघाईने ती रेशमी साडी स्वत:भोवती गुंडाळली. साडीची शेवटीची निरी खोचल्यावर तिने आरशात पाहिले. तिचे केस अजूनही ओलेच होते, गुंता झाला होता; पण या क्षणी तर *तेवढ्यावरच भागवायचे होते*—आणि मग ती झपाट्याने तिथून निघाली.

घराबाहेर पाऊल टाकताच, तिला हे पाहून दिलासा मिळाला की, मिरवणूक काही पावलेच पुढे गेली होती. ती पटकन गर्दीत सामील झाली आणि त्यानंतर पुढे तासभर ती रस्त्यावर त्या मिरवणूकीच्या धांगडधिंग्यामध्ये, धामधूमीत मनसोक्त गायली व नाचली, तिने त्याचा पुरेपूर आनंद घेतला. अखेरीस

काही मैत्रिणींसह ती घरी परतली; त्या सर्व जणी अगदी श्वास कोंडेपर्यंत हसतखिदळत होत्या आणि हसतहसतच त्या तिच्या घरातील दिवाणावर जाऊन आडव्या झाल्या.

काही क्षणांच्या सुस्तावलेल्या शांततेनंतर ती महिला उठून बसली. तिने आपली मान आणि छाती चाचपडून पाहिली, सुरुवातीला हळुवारपणे आणि मग गांगरून जाऊन. तिला तर धक्काच बसला, तिचे डोळे विस्फारले.

“का गं, काय झालं?” तिच्या एका मैत्रिणीने काळजीने विचारले. “तू काही शोधते आहेस का?”

“माझा गळ्यातला हार!” धास्तावलेल्या स्वरात ती महिला म्हणाली. “माझा हिऱ्यांचा हार! मिरवणूकीत जाण्यापूर्वी मी तो घातला होता, आणि—आणि आता तो गायब झाला आहे!”

“काळजी करू नकोस,” मैत्रीण धीर देत म्हणाली. “तो शोधायला आम्ही तुला मदत करू. कदाचित तो घरातच कुठे तरी असेल.”

“नाही, नाही, मला चांगलं आठवतंय की, निघण्यापूर्वी मी तो घातला होता!” ती ओरडून म्हणाली. आणि त्याचबरोबर ती फर्निचरच्या मागे, उश्या आणि इतर वस्तू उचलून सगळीकडे शोधू लागली. तिच्या मैत्रिणीही तिला शोधायला मदत करू लागल्या.

पण त्यांच्या प्रयत्नांना काही यश आले नाही. ती महिला धास्तावून तिच्या मैत्रिणींकडे पाहून म्हणाली, “जर—जर कुणीतरी तो हार *चोरला* असेल, तर?

“म्हणजे तुला असं म्हणायचं आहे का, की त्या मिरवणूकीमध्ये?”

“हो!” ती महिला म्हणाली. “तो माझा फार मौल्यवान कंठहार होता, आणि तो चोरण्याची त्यांच्याकडे चांगलीच संधी होती. मला तर *पूर्ण खात्री* आहे की, कोणा चोराकडेच माझा कंठहार असणार!”

ती महिला पुन्हा खाली दिवाणावर बसली, या नव्या शक्यतेचा गंभीरपणे विचार करू लागली. ती मुसमुसून रडू लागली.

“तो खूपच सुंदर होता,” ती चिडून म्हणाली. “तो वंशपरंपरागत हार होता. माझ्या कुटुंबीयांनी त्याविषयी काही विचारले तर? मला माहीत नाही मी *काय* सांगेन. ओह, मला तो हार किती प्रिय होता! मी तो दररोज घालायचे. आणि आता कुणीतरी तो चोरून नेला—त्याची हिंमत तर पाहा, यावर

तुमचा विश्वास बसतो आहे का? किंवा. . .किंवा. . .कदाचित माझा हार *पायदळी तुडवला गेला असेल!* हो, आता मी जेव्हा त्याविषयी आणखी विचार करते आहे, तेव्हा माझ्या लक्षात येते आहे की, काय घडले असेल. तुम्हाला तर माहीतच आहे ना, मी आधीपासून सांगत होते की, ती मिरवणूक खूपच गोंधळाची होती, किती गर्दी होती तिथे—"

तिचे असे स्वतःशीच बोलणे सुरू असताना मध्येच तिची मैत्रीण अचानक म्हणाली, "ते काय आहे?"

ती महिला हुंदके देत म्हणाली. "ते म्हणजे काय?"

*"अगं ते,"* मैत्रीण महिलेकडे बोट दाखवत म्हणाली.

"तू काय—" गोंधळून ती महिला बोलू लागली, तोच तिची मैत्रीण तिच्याजवळ आली. "मी आधीच तपासून खात्री करून घेतली आहे—*ओह!*"

त्या महिलेच्या गळ्याजवळ काहीतरी सोनेरी आणि चमचमत असलेले दिसत होते, जे तिच्या साडीच्या घड्यांमधून बाहेर डोकावत होते. त्या मैत्रिणीने हळूच ओढून काढले आणि ते बाहेर आले—एक नाजूकशी साखळी जिच्यावर अनेक पांढरे, गोल आकाराचे हिरे एकत्र ओवलेले होते.

"माझा हार!" त्या महिलेने सुटकेचा निःश्वास सोडला. "माझा हार!" ती पुन्हा म्हणाली आणि या वेळी तिचा आवाज मोठा व आनंदी होता, काय घडले असेल हे तिच्या लक्षात येऊ लागले. तिच्या चेहऱ्यावरून पुन्हा अश्रू वाहू लागले, पण ते आनंदाश्रू होते.

"तर तो कंठहार मुळी हरवलाच नव्हता?" त्या महिलेने स्वतःला सावरल्यानंतर मैत्रीण गंमतीने म्हणाली.

या प्रश्नाचे उत्तर देताना त्या महिलेच्या चेहऱ्यावर मृदुभाव होता.

"नाही," ती म्हणाली. "नाही, मला वाटते तो हरवलाच नव्हता. तो तर कायम माझ्यापाशीच होता.

*ही गोष्ट भारतीय वेदान्त तत्त्वज्ञानाच्या ग्रंथांमध्ये कथित एका पौराणिक कथेतून प्रेरित आहे.*

©२०२४ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.